




मुंबई : शाहू कोल्हापूर विकास प्रतिष्ठानतर्फे खासदार राजू शेट्टी यांचा सत्कार करण्यात आला.

## औरवाड-गणेशवाडी रस्त्यासाठी निधी मंजूर

जयसिंगपूर : शिरोळ तालुक्यातील औरवाड-गणेशवाडी रस्त्यासाठी खासदार राजू शेट्टी यांच्या प्रयत्नातून केंद्रीय मार्ग निधीतून चार कोटी रुपये मंजूर झाल्याची माहिती, माजी जिल्हा परिषद सदस्य सावकर मादनाईक यांनी दिली. औरवाड-गणेशवाडी हा दहा किमी लांबीच्या रस्ता दुरुस्त करण्याची मागणी ग्रामस्थांनी खासदार शेट्टी यांच्याकडे केली होती. रस्त्याची खराब अवस्था आणि ग्रामस्थांची मागणी लक्षात घेऊन खासदार शेट्टी यांनी केंद्रीय मार्ग निधीतून चार कोटी रुपये मंजूर करण्यासाठी विशेष प्रयत्न केले आहेत. लवकरच या कामाला सुरवात होणार आहे.

स्वाभिमानी विचार
Book-Post

प्रति,

RNI No. - MAH/MAR/2005/16213
Rgd. No.L2/17/RNP/ K.L.P/234/09-11

वर्ष ६ | अंक ६ | १५ फेब्रुवारी २०११ | किंमत ५ रुपये | पाने १६

# स्वाभिमानी विचार

RNI NO-MAH/MAR/2005/16213
REGD NO - K.L.P/234/09-11

संपादक : खासदार राजू शेट्टी

## पेट्रोल, डिझेल दरवाढीवर 'ते' गप्प का?



घुणकी : ''शेतकऱ्यांच्या उत्पादित मालाला चांगला दर मिळाला की महागाई वाढली अशी ओरड करणारे डिझेल, पेट्रोल, गॅसच्या दरवाढीवर गप्प का?' असा सवाल खासदार राजू शेट्टी यांनी केला.

वाठार तर्फ वडगाव येथे श्री. शेट्टी यांचा नागरी सत्कार व खासदार फंडातील रस्त्याचा उद्घाटन समारंभ झाला, त्यावेळी ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्रगतिशील शेतकरी विजय माने होते.

उपसरपंच विनोद पाटील यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. खासदार शेट्टी यांचा नागरी सत्कार सरपंच गणेश कुंभार यांच्या हस्ते झाला.

पान ४ वर

## पडिक जमिनीत तेलताड शेतकऱ्यांना वरदान

### खासदार शेट्टी : तेलताड लागवड तंत्रज्ञानविषयक कार्यशाळा

कोल्हापूर, : पडिक जमीन लागवडीखाली येऊन ग्रामीण भागात रोजगारनिर्मिती होणार असल्याने तेलताड लागवड ही शेतकऱ्यांना वरदान ठरेल, असे मत खासदार राजू शेट्टी यांनी व्यक्त केले. विभागीय कृषी सहसंचालक व मुंबईच्या गोदरेज ॲग्रोव्हेट यांच्या संयुक्त विद्यमाने येथे तेलताड लागवड तंत्रज्ञानविषयक विभागीय कार्यशाळा झाली. कार्यशाळेचे उद्घाटन खासदार शेट्टी यांच्या हस्ते झाले. त्यावेळी ते बोलत होते.

श्री. शेट्टी म्हणाले, ''कोल्हापूर व सांगली जिल्ह्यात क्षारपड जमिनीचा प्रश्न भेडसावत आहे. त्यामध्ये मस्त्य शेती, बांबू लागवड, शुगरबीट आदीचे प्रयोग केले; पण ते यशस्वी झाले नाहीत. त्यानंतर तेल-ताड लागवड शेतकऱ्यांसाठी

पान ३ वर



# शासनाचे धोरणच जबाबदार

नुकतेच कृषी मंत्री शरद पवार यांचा कोल्हापूर दौरा झाला. त्या दौऱ्यामध्ये त्यांनी कांद्याचे दर वाढले तरी मीच जबाबदार आणि उतरले तरी मीच जबाबदार असे वक्तव्य केले होते. तसेच शेतकरी सुखी तर सर्वजण सुखी असेही ठासून सांगितले होते. वास्तविक पाहता शेतकऱ्यांच्या या अवस्थेला कृषीमंत्री स्वत: जबाबदार नसून त्यांचे व त्यांच्या कृषी मंत्रालयाचे धोरणच जबाबदार आहे. आणि कृषी मंत्री म्हणून या सर्वांची जबाबदारी शरद पवार यांच्यावरच जाते, हे वास्तव नाकारता येत नाही.

सध्या कांद्याचे ढासळलेले दर पाहता शेतकऱ्यांची अवस्था अतिशय केवीलवाणी झाली आहे. केवळ दोन रुपये दराने कांदा शेतकऱ्यांकडून खरेदी केला जात आहे आणि तोच कांदा बाजारात पंधरा ते वीस रुपये दराने विकला जात आहे. देशातील सर्वात मोठी कांद्याची बाजारपेठ लासलगाव येथे आहे. याच बाजारपेठेत कांद्याचे दर मोठ्या प्रमाणात ढासळले आहेत. मुळात एकूण कांद्यापैकी ८५ टक्के कांदा हा अवकाळी पावसामुळे नष्ट झाला आहे. केवळ पंधरा टक्केच कांदा उरल्यामुळे ऐन थंडीत कांद्याला मागणी वाढल्यामुळे कांद्याचे दर वधारले आहेत. असे असताना कृषी मंत्री शरद पवार यांनी कांद्यावर त्वरित निर्यातबंदी लादली तसेच पाकिस्तान व चीनमधील नको असताना कांदा आयात करण्यात आला याचा मोठा फटका भारतीय कांद्याला बसला. त्यामुळेच कांद्याचे दर ढासळत गेले नि शेतकरी रडकुंडीला आला. याला जबाबदार कोण कांद्याचे दर चाळीस रुपये किलो झाल्याने शासनाने अल्पदरात कांदे विक्री केंद्रे सुरू केली. यामध्ये ग्राहकांचे हित बघितले. जगाचा पोशिंदा असलेल्या शेतकऱ्यांना वाली कोण? असा प्रश्न निर्माण झाला आहे; कारण कांद्याचे दर उतरल्यावर शासनाने जास्त दरामध्ये कांदा खरेदी केंद्रे सुरु करणे आवश्यक होते तरच शेतकऱ्यांना थोडासा दिलासा मिळाला असता.

मुठभर लोकांच्या हितासाठी लाखो शेतकऱ्यांचा बळी देण्यात आला. भाव वधारल्याने काही शेतकऱ्यांनी कांद्याची लागवड केली होती, पण सध्या दर उतरल्याने शेतकरी कर्जबाजारी होण्याची चिन्हे निर्माण झाली आहेत. कमी दरामुळे अनेक ठिकाणी कांदा ओतून देण्यात आला. कांद्याचे दर वाढल्यावर राजकीय पक्षांनी आंदोलन केल्यावर त्यांना संरक्षण दिले जाते नि दर उतरल्यावर शेतकऱ्यांनी आंदोलन केल्यावर त्यांच्यावर लाठीचार्ज करून गुन्हे दाखल केले जातात. हा सुलतानी न्याय कुठल्या राज्यातून आला? त्यामुळे शेतकरी आम्ही आत्महत्या करायची काय अशी विचारणा करत आहेत. कृषीमंत्री शरद पवार यांनी कागल येथे केलेले वक्तव्य थोतांड आहे हेच यावरून सिद्ध होते

शेतकरी संघटना स्वाभिमानी

◆ वर्ष ६ ◆ अंक ६ ◆१५ फेब्रुवारी २०११ ◆ **संपादक :** खासदार राजू शेट्टी Email : rajushetti@gmail.com ◆ **कार्यकारी संपादक :** डॉ. महावीर अक्कोळे ◆ **सह संपादक :** डॉ. श्रीवर्धन पाटील, जगदीश इनामदार, ◆**मानद सल्लागार : मा. श्री. अण्णा हजारे** राळेगणसिद्धी, **न्या. पी. बी. सावंत** पुणे, **न्या.बी.जी.कोळसे पाटील** पुणे, . **प्रा. शरद पाटील** सांगली, **कुमार सप्तर्षी** पुणे, **माजी आमदार. वामनराव चटप** चंद्रपूर ◆ **व्यवस्थापक :** सुभाष शेट्टी ◆ **कार्यालय :** भरत पतसंस्थेच्या माडीवर, पोलीस स्टेशनसमोर, जयसिंगपूर, ता. शिरोळ. फोन : (०२३२२) २२४३२७

**SWABHIMANI VICHAR (Fortnightly)** स्वाभिमानी प्रतिष्ठान संचलित पाक्षिक स्वाभिमानी विचार हे पत्र संपादक ✻खासदार राजू उर्फ देवाप्पा आण्णा शेट्टी यांनी स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, पोलिस स्टेशननजीक, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर, (महाराष्ट्र राज्य) येथे प्रकाशित केले. प्रकाशन स्थळ : स्वाभिमानी शेतकरी संघटना मध्यवर्ती कार्यालय, ९ वी गल्ली, राधाबाई रोड, जयसिंगपूर-४१६ १०१, ता. शिरोळ, जि. कोल्हापूर (महाराष्ट्र राज्य). दूरध्वनी : (०२३२२) २२४३२७. मुद्रण स्थळ : सुनील प्रिंटर्स, जयसिंगपूर. फोन (०२३२२) २२४३२७ पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी ✻ यांची आहे. पाक्षिक स्वाभिमानी विचारमधील सर्व लेखांचे हक्क राखून ठेवण्यात आलेले आहेत. **Decleration No. Desk No. VII Home N.P.S.R./58/2005 RNI No. MAH/ MAR/2005/16213 या अंकातील लेखांशी संपादक सहमत असतीलच असे नाही.**

वार्षिक वर्गणी
रु. १००/-

# पडिक जमिनीत तेलताड शेतकऱ्यांना वरदान

▶ पान १ वरुन

किफायतशीर होईल का, यासाठी केंद्र आणि राज्य शासनाकडे पाठपुरावा केला. शासनाने त्याची दखल घेऊन महाराष्ट्रात कोल्हापूर व कोकण विभागासाठी तेलताड लागवड कार्यक्रम प्रस्तावित केला. तेलताड लागवडीमुळे देशातील तेलाची गरज भागवण्यास मदत होणार आहे; शिवाय या पिकास जंगली श्वापदांपासून किंवा चोरांपासून त्रास संभवत नाही.''

या वेळी फलोत्पादन संचालनालयाचे उपसंचालक एम. डी. लोहकरे, अधीक्षक कृषी अधिकारी एन. टी. शिसोदे, गोदरेज अॅग्रोव्हेटचे उपाध्यक्ष आर. आर. गोविंदन व मुख्य कृषीतज्ज्ञ डॉ. व्ही. एम. रेड्डी, डॉ. जितेंद्र कदम आदी उपस्थित होते.

श्री. लोहकरे यांनी महाराष्ट्रात तेलताड लागवडीसाठी शासनाच्या अनुदानाच्या योजनांची माहिती दिली. नगदी पीक म्हणून तेलताड लागवड शेतकऱ्यांना भविष्यात एक आशेचा किरण असल्याचे सांगून डॉ. जितेंद्र कदम यांनी क्षारपड व चांगल्या जमिनीतील तेलताड लागवड व त्याचे संगोपन याची माहिती दिली.

गोदरेज कंपनीचे उपाध्यक्ष गोविंदन व रेड्डी यांनी तेलताड लागवडीपासून काढणी, प्रक्रिया व मार्केटिंग यासंबंधी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना उत्तरे दिली. कार्यशाळेत तेलताडची लागवड केलेल्या शेतकऱ्यांनीही मनोगत व्यक्त केले. कोल्हापूर विभागातील सातारा, सांगली व कोल्हापूर जिल्ह्यातील अधिकारी, कर्मचारी, शेतकरी तसेच कोकण विभागातून व कर्नाटक राज्यातून शेतकरी उपस्थित होते. तंत्र अधिकारी डी. एस. पवार यांनी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. एन. बी. कदम यांनी आभार मानले.








प्रोप्रा. अरुण किर्तीकुमार माणगावे

M/S. MANGAVE BOREWELLS

BOREWELL CONTRACTOR

Opp. Mangave Petrol Pump. Jaysingpur. Dist : Kolhapur (M.S.)

Ph. (02322) 229866. Mo. 9822551008/9422428266



Shree Datta

Prestrestess

M.f. PCC Pole

Shirol Road, Jaysingpur.

# आवळी ते शिंदेवाडी रस्ता डांबरीकरण उद्‍घाटन

देवाळे, ता. ७ : आवळी ते शिंदेवाडी रस्त्याचे डांबरीकरण उद्‍घाटन सातवे येथील स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे ज्येष्ठ नेते वसंतराव पाटील (गुरुजी) यांचे हस्ते झाले.

हा रस्ता खासदार राजू शेट्टी फंडातून पश्चिम घाट साकव योजनेतून २० लाख मंजूर झाले होते. या रस्त्यामुळे सातवे, आरळे, शिंदेवाडी, आवळी गावातील लोकांना शाहूवाडी तालुक्यात जाण्यासाठी सोयीचा ठरणार आहे. यावेळी सातवेचे सरपंच संजय दळवी, डे. सरपंच जालिंदर शिंदे, काकासाहेब शिंदे, सखाराम शिंदे, रंगराव शिपुगडे, प्रताप भोसले, गणपती भिंगार्डे, गुंगा चव्हाण आदी उपस्थित होते.



**आवळी : शिंदेवाडी रस्त्याचे उद्‍घाटन करताना वसंतराव पाटील. सरपंच संजय दळवी, उपसरपंच जालिंदर शिंदे, तानाजी मोरे, धनाजी सावंत व ग्रामस्थ.**

# पेट्रोल, डिझेल दरवाढीवर ‘ते’ गप्प का?

▶ पान १ वरुन

या वेळी शेतकरी संघटनेचे प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत, ग्रामपंचायत सदस्य सौ. स्वाती क्षीरसागर, पी. डी. पाटील, बी. आर. गायकवाड यांनी शेतकऱ्यांच्या समस्या मांडल्या. शेतकरी संघटनेचे तालुकाध्यक्ष सदाशिव कुलकर्णी, उपाध्यक्ष महावीर पाटील, पंचायत समिती उपसभापती अरुण मगदूम, माजी सरपंच सौ. माया कुंभार, महेंद्र शिंदे, शिवाजी माने, अजित पाटील, शिवाजी शिंदे, नंदकुमार क्षीरसागर यांच्यासह शेतकरी संघटनेचे कार्यकर्ते, ग्रामस्थ उपस्थित होते. डॉ. महेश पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

## श्री भरत अर्बन को-ऑफ बँक लि., जयसिंगपूर

ता. शिरोळ, जि. कोल्हापूर फोन : २२५४३०, २२५७२२ २२९९२३ फॅक्स नं. : ०२३२२ २२५७२३

■ २८ हजारांवर सभासद ■ संस्थापक, संचालक व्यवस्थापन ■ सर्व शाखा कार्यालये स्वत:चे इमारतीत ■ अद्यावत कॉम्प्युटर सेवा ■ सर्व शाखांकडे लॉकर्सची सोय ■ लाखापर्यंतच्या ठेवीस विमा संरक्षण देशातील प्रमुख ४८८ शहरांवरील डी.डी.ची अल्प कमिशनमध्ये सोय ■ बँक सतत नफ्यात ■ ज्येष्ठ नागरिकांसाठी ठेवीवर १/२ टक्के जादा व्याज ■ १० ग्रॅम चोख सोन्यास रु. १४००० कर्ज १० टक्के व्याजदराने

| ठेवी | कर्जे | ऑडिट वर्ग | | स्वभांडवल | गुंतवणूक | एन.पी.ए. |
|---|---|---|---|---|---|---|
| ४१४७.९५ | २१७८.७१ | ---- | नफ्यात | ४५५.१५ | २१८९.४३ | ३.३७ टक्के |

**श्री. व्ही. बी. हुग्गे.**
बी. ए. बी. कॉम.
चिफ एक्झि ऑफिसर

**श्री. अशोक शां रूणवाळ.**
बी. कॉम
व्हा. चेअरमन
व सर्व संचालक

**पै. विठ्ठल बाबूराव मोरे**
एम. ए.
चेअरमन

# रेल्वे सुरक्षा दलाच्या पोलिसाविरुद्ध शेतकऱ्यांची तक्रार

## खासदार शेट्टींकडून गंभीर दखल : शेतकऱ्याला रेल्वेतून फेकल्याचे प्रकरण

मिरज : हप्त्यासाठी शेतकऱ्यास चालत्या रेल्वेतून खाली ढकलून देणाऱ्या रेल्वे सुरक्षा दलाचा पोलिस कर्मचारी सुधाकर जाधव याच्यासह अन्य हप्तेखोर पोलिसांविरुद्धही आणखी काही शेतकऱ्यांनी तक्रारी दाखल केल्या आहेत. वरिष्ठांनी याची गंभीर दखल घ्यावी, अशी शेतकऱ्यांची मागणी आहे. दरम्यान, खासदार राजू शेट्टी यांनीही शेतकऱ्यांना छळणाऱ्या अशा पोलिसांचा वरिष्ठांनीच बंदोबस्त करावा, अशी मागणी केली आहे.

अनेक वर्षांपासून मिरज पूर्व भागातील मालगाव, एरंडोली, टाकळी, बोलवाड यासह अन्य गावांमधील काही शेतकरी कोल्हापूरला जाऊन शेतीमालाची विक्री करतात. हे शेतकरी सकाळच्या आठ आणि साडेअकराच्या गाडीने आपला किरकोळ माल घेऊन कोल्हापूरला जातात. पण गेल्या अनेक दिवसांपासून त्यांची रेल्वे सुरक्षा दलातील काही कर्मचाऱ्यांकडून लूट होत आहे. जादा वजन, लगेज पावती नसणे, रूळ ओलाडंणे, यासारख्या गुन्ह्यांची भीती घालून पोलिस शेतकऱ्यांकडून पैसे काढतात. यापैकीच सुधाकर जाधव या पोलिसाने २८ जानेवारीस मालगावच्या नेमीनाथ भंडे या शेतकऱ्यास चालत्या रेल्वेतून ढकलून देऊन त्याची गाजराची गाठोडीही बाहेर फेकून दिली.

गाडीतील सहप्रवाशांनी नेमीनाथ भंडे यांना पकडल्याने ते बचावले. याप्रकरणी नेमीनाथ भंडे यांनी रेल्वे सुरक्षा दलाच्या मिरज कार्यालयात तक्रार केली. त्याच्या तक्रारी पाठोपाठ भंडेशिवाय अन्य शेतकऱ्यांनीही याच त्रासाबाबत तक्रार केली आणि वसूली थांबविण्याची विनंती केली. येथील स्थानिक अधिकाऱ्यांनी हप्तेखोर पोलिसांचा बंदोबस्त करण्याचे आश्वासनही शेतकऱ्यांना दिले. दरम्यान, याच शेतकऱ्यांनी शिरोळचे खासदार राजू शेट्टी यांचीही भेट घेतली आणि त्यांनाही रेल्व सुरक्षा दलाकडून होणाऱ्या छळवणुकीची माहिती दिली. खासदार शेट्टी यांनीही तातडीने रेल्वे सुरक्षा बलाच्या पुण्यातील वरिष्ठ अधिकाऱ्यांशी सपंर्क साधून शेतकऱ्यांना छळणाऱ्या मिरजेतील पोलिसांचा वरिष्ठांनीच बंदोबस्त करावा, अशा सूचना दिल्या. याकडे दुर्लक्ष झाले तर शेतकऱ्यांच्या उद्रेकास रेल्वे सुरक्षा दलास सामोरे जावे लागेल असेही सुनावले. केवळ हप्त्यासाठी शेतकऱ्याची होणारी लूटमार शेतकरी सहन करणार नाही असेही खासदार शेट्टी यांनी सांगितले.

### वसुलीस चाप

अनेक दिवसांपासून मिरज रेल्वे स्थानकावरील सुरक्षा दलाच्या लुटीबाबत सातत्याने आरोप होत आहेत. हप्ता देऊन खोट्या केसेसही अंगावर घ्यायच्या. एवढे करूनही पोलिसांची मजल आता शेतकऱ्यांना चालत्या गाडीतून ढकलून देण्यापर्यंत गेल्याने शेतकरी आता पेटून उठले आहेत. या संतप्त प्रतिक्रियेमुळेच सध्या मिरज रेल्वे स्थानकावरील वसुली सध्यातरी बंद आहे.

# शेतकऱ्यांसाठी राष्ट्रीय आपत्ती फंड हवा

राजू शेट्टी, खासदार, स्वाभिमानी शेतकरी संघटना

केंद्र सरकारने शेतीमालाचे आयात-निर्यात धोरण स्थिर ठेवावे. हे धोरण स्थिर नसल्याने याचा फटका आज देशातील कोट्यवधी शेतकऱ्यांना बसत आहे. शेतकऱ्याला हमीभाव द्यावा. कोणत्याही कारणाने बाजारपेठेत शेतीमालाची आवक-जावक कमी-जास्त झाल्यास त्याचा फटका थेट शेतकऱ्याला बसतो. किमान आधारभूत किंमत उत्पादनमूल्याच्या पन्नास टक्के अधिक असावी ही स्वामिनाथन समितीची शिफारस अमलात येणे गरजेचे आहे. कृषिमूल्य आयोगाने ही बाब गांभीर्याने घ्यावी. आज स्थिर हमीभावासाठी देशभरातील शेतकरी प्रत्येक वर्षी झगडत आहे. बाजारपेठेतील उलाढालीचे प्रतिकूल परिणाम शेतकऱ्याला थेट जाणवू नयेत, यासाठी यंत्रणा कार्यान्वित व्हावी अशी मागणी नॅशनल अलायन्स ऑफ फार्मर्स असोसिएशन (नाफा)च्या वतीने आम्ही केंद्र सरकारकडे केली आहे. शेतकऱ्याला प्रत्येक पिकाला किमान आधारभूत किंमत मिळायलाच हवी यासाठी केंद्राने आगामी अर्थसंकल्पात योजना तयार कराव्यात अशी आमची प्रमुख मागणी आहे.

गेल्या काही वर्षांत ग्लोबल वॉर्मिंगमुळे वातावरणाचे संतुलन बिघडले आहे. अवकाळी हवामानात वाढ होत असल्याने शेतकऱ्यांच्या नुकसानीत दरवर्षी वाढ होते. नुकसानभरपाईबाबत तयार केलेल्या शिफारशी या अत्यंत जुन्या आहेत. काही शिफारशी तर ब्रिटिशकालीन आहेत. अलीकडे वातावरणात अचानक बदल झाल्याने पिकांच्या नवीन काही वाणांचे नुकसान वेगवेगळ्या पद्धतीने होत असते, पण हे नुकसान जुन्या निकषात बसत नाही.

यामुळे हवामानामुळे शेतीमालाचे नुकसान होऊनही शेतकऱ्याला पुरेशी नुकसानभरपाई मिळत नाही. मिळणारे सानुग्रह अनुदान तकलादू असते. यामुळे शेतकऱ्यांसाठी मिळणारी शासकीय मदत हा चेष्टेचा विषय होत आहे. हे टाळण्यासाठी केंद्राने राष्ट्रीय आपत्ती फंड निर्माण करावा अशी आमची मागणी आहे. या फंडासाठी स्वतंत्र तरतूद असावी. शेतीवर एखादी आपत्ती आल्यास या फंडातून थेट पैसे संबंधित शेतकऱ्याला मिळावेत अशी आमची भूमिका आहे.

शेतकऱ्याला तातडीने व पुरेशी रक्कम मिळाल्यास तो नुकसानीतून तातडीने सावरू शकतो. या

# कांदा मार्केट झाले भुईसपाट

नवी मुंबई: गेल्या काही महिन्यांत गगनाला भिडलेल्या दरामुळे ग्राहकांना रडवणाऱ्या कांद्याचे दर आज एकदम कोसळले... अगदी भुईसपाटच झाले! घाऊक बाजारात ७० ते ८० रुपये प्रति किलोपर्यंत जाऊन पोचलेला कांदा आज घाऊक बाजारात ६ ते ७ रुपये प्रतिकिलोवर आला आहे. दरातील ही घसरण साधारणतः ९० टक्के इतकी आहे; मात्र असे असले, तरी किरकोळ व्यापाऱ्यांनी हा कांदा खरेदी करण्याकरिता फारसा उत्साह दाखविला नाही, त्यामुळे बहुतांश ठोक व्यापाऱ्यांकडे कांदा अक्षरशः पडून आहे.

गेल्या सहा महिन्यांपासून सुरू असलेली कांद्याची दरवाढ या आठवड्यापासून आटोक्यात यायला सुरुवात झाली आहे. आठवड्याभरापूर्वी कांदा १० ते २५ रुपये किलोवर आला होता. कांद्याची आवक घाऊक बाजारात वाढू लागल्याने हे दरही खाली यायला सुरुवात झाली. त्याचा परिणाम आता बाजारात दिसू लागला आहे. त्यातच नाशिक येथे शेतकऱ्यांनी पुकारलेल्या बंदमुळे नाशिकच्या बाजारपेठेत जाणारा कांदाही वाशीच्या मुंबई कृषी उत्पन्न बाजार समितीकडे वळला आहे. त्यामुळे आज येथील कांदा-बटाटा मार्केटमध्ये कांद्याच्या २०० हून अधिक गाड्या दाखल झाल्या आहेत. त्यामुळे कांद्याचे दर कोसळले.





येडेमच्छिंद्र (ता. वाळवा) : ज्योतिर्लिंग मंदिरासमोरील सांस्कृतीक सभागृहाच्या कोनशिला अनावरण प्रसंगी खासदार राजू शेट्टी, सदाभाऊ खोत, सुरेश पाटील.

# स्वीस बँकेतील काळा पैसा आणा; कर भरण्याची गरजच राहणार नाही

## राजू शेट्टी : येडेमच्छिंद्र येथे दूध आंदोलनात सहभागाचे आवाहन

भवानीनगर, ता. ३१ : स्वीस बँकेतील काळा पैसा भारतात आणला तर पुढील तीस वर्षात भारतीय लोकांना एकही रुपयाचा कर भरावा लागणार नाही. स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या ऊस आंदोलनात शेतकऱ्यांनी दाखवलेली एकजूट दूध आंदोलनात दाखवावी, असे आवाहन खासदार राजू शेट्टी यांनी केले.

येडेमच्छिंद्र (ता. वाळवा) येथे जोतिर्लिंग मंदिरासमोरील सांस्कृतिक सभागृहाच्या कोनशिला अनावरणप्रसंगी आयोजित जाहीर सभेत ते बोलत होते. प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत अध्यक्षस्थानी होते. खासदार शेट्टी म्हणाले, ''गुजरातपेक्षा आपल्याकडे दुधास तीन रुपये दर कमी आहे. दुधाला भाव मिळावा, यासाठी आंदोलन करणार आहे. शेतकऱ्यांनी संघटनेच्या पाठीशी राहावे. शेतकरी एकजूट झाला की काय होते, हे ऊसदर आंदोलनात सर्वांनी पाहिले आहे.''

''सहकारमंत्री ऊस शिल्लक राहण्याची भाषा करू लागले

पान १० वर ▶

# शेतकऱ्यांसाठी दूध आंदोलन करणार

हेर्ले : स्वाभिमानी शेतकरी संघटनेने आंदोलन करून ऊस उत्पादक शेतकऱ्यांना ४० हजार कोटी रुपये जादा मिळवून दिले. त्यामुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या कुटुंबांची अर्थव्यवस्था सुधारण्यास वाव मिळाला. ग्रामीण भागातील शेतकरी व शेतमजूर यांच्यात आर्थिक सुबत्ता निर्माण होईल. शासनाने दूध दरवाढीचा विचार न केल्यास आंदोलन करून कष्टकऱ्यांच्या घामाला दाम मिळवून देणार असल्याचे प्रतिपादन खासदार राजू शेट्टी यांनी केले. येथे आयोजित केलेल्या जाहीर सत्कार समारंभात ते बोलत होते. अध्यक्षस्थानी सदाभाऊ खोत होते.

शेट्टी म्हणाले, ''उसाला १५०० रुपयांपेक्षा जादा दर देता येत नसल्याचे तुणतुणे शासन वाजवीत होते; परंतु



संघटनेच्या आंदोलनापुढे त्यांना नमते घेत २००० रुपये देण्यास भाग पाडले.'' यामुळे आठ कोटी टन गाळप उसाला सरासरी ५०० रुपयांप्रमाणे ४० हजार कोटी रुपये जादा मिळाले. जनतेच्या पैशावर कारभार चालवणारे सरकार घोटाळ्यावर घोटाळे करीत आहेत. शेतकरी व शेतमजूर यांच्या घामाला योग्य दाम मिळविण्यासाठी ऊस आंदोलनानंतर दूध आंदोलनही हातात घेणार असल्याचे खासदार शेट्टी यांनी जाहीर केले.

माजी खासदारांना राजू शेट्टींच्या गाडीची किंमत किती हेही माहिती नाही. त्यांनी १० वर्षांचा कारभारही माहिती न घेता फक्त बोलूनच घालविला. त्यामुळे त्यांनी पुन्हा खासदारकीची स्वप्ने पाहू नयेत, असा टोला सदाभाऊ खोत यांनी श्रीमती निवेदिता माने यांना नाव न घेता लगावला.

या वेळी सरपंच रियाज जमादार, उपसरपंच राजेश पाटील, झाकीर देसाई, भगवान काटे यांनीही मनोगत व्यक्त केले. कार्यक्रमासाठी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांसह शेतकरी व तरुण मंडळे मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# स्वीस बँकेतील काळा पैसा आणा; कर भरण्याची गरजच राहणार नाही

▸ पान ७ वरुन

आहेत; परंतु ऊस शिल्लक राहणार नाही, याची मी खात्री देतो. स्वीस बँकेतील काळा पैसा भारतात आणला तर पुढील तीस वर्षांत भारतीय लोकांना एकाही रुपयाचा कर भरावा लागणार नाही. शेतकऱ्यांना कर्जमाफी दिली म्हणून ओरड करणाऱ्या सरकारने खेळात ३० हजार, स्पेक्ट्रममध्ये १ लाख ७६ हजार कोटी रुपयांचा घोटाळा केला आहे.''

प्रदेशाध्यक्ष खोत म्हणाले, '' १५०० रुपये दर देण्याचा साखरसम्राटांचा कुटिल डाव संघटनेच्या एकजुटीमुळे उधळून लावणे शक्य झाले.'' जिल्हाध्यक्ष बी. जी. पाटील, शहाजी पतंगराव पाटील यांची भाषणे झाली. नामदेव रणदिवे यांचा शेतकरी संघटनेत प्रवेशाबद्दल सत्कार झाला. कृष्णा कारखान्याचे उपाध्यक्ष सुरेश पाटील, आदर्श सचिव अरविंद पाटील यांचाही सत्कार झाला. रवींद्र कुलकर्णी यांनी स्वागत केले. सरपंच सुरेश पाटील यांनी विविध मागण्यांचे निवेदन खासदार शेट्टी यांना दिले. युवा आघाडीचे संदीप राजोबा, उत्तमराव पाटील, बशीर मुल्ला, संजय हिंगणे, रणजीत पाटील, हणमंत पाटील, रमेश पाटील उपस्थित होते. डॉ. सचिन पाटील यांनी आभार मानले.

# साखरेवरील निर्यातबंदी उठवावी

## खासदार राजू शेट्टींची पंतप्रधानांकडे पत्राद्वारे मागणी

मुंबई, ता. २ : साखरेवरील निर्यातबंदी उठवावी आणि देशातील आठ कंपन्यांना निर्यात परवाना असताना या महिन्यात खुल्या बाजारातील दर उतरविण्यासाठी साखरेचा अतिरिक्त कोटा बाजारात आणून, त्या कंपन्यांचा मोठा आर्थिक फायदा करण्याच्या प्रकारामागे कोण आहे, हे शोधून काढण्यासाठी चौकशी करण्याची मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे खासदार राजू शेट्टी यांनी पंतप्रधान मनमोहनसिंग यांना पत्र पाठवून केली आहे.

शेट्टी आणि जनता दलाचे (धर्मनिरपेक्ष) अध्यक्ष प्रभाकर नारकर यांनी आज या संदर्भात पत्रकार परिषद घेतली. साखरेचे दर वाढलेले असताना तमिळनाडू, कर्नाटकमधील शक्ती, रेणुका, राजश्री आदी आठ साखर कंपन्यांना सुमारे ३५० डॉलर प्रतिटन दराने सुमारे ३२ लाख टन कच्ची साखर आयात करण्याची परवानगी देण्यात आली होती. आयातीएवढी साखर पुढील तीन वर्षांत निर्यात करण्याचा परवाना देण्यात आला. देशात सध्या ४० लाख टन इतके साखरेचे अतिरिक्त उत्पादन आहे. तरीही साखरेच्या निर्यातीवर बंदी आहे. गेल्या वर्षी जानेवारीला ११ लाख टन साखरेचा कोटा खुल्या बाजारात वितरित केला असताना यंदा तो पाच लाख टनांनी वाढवून १६ लाख टन वितरित केला. त्यामुळे खुल्या बाजारातील दर उतरले असून, सध्या क्विंटलला २,४०० ते २,७०० रुपये दर आहे. साखर कारखान्यांना कोट्याइतकी साखर बाजारात आणण्याशिवाय पर्याय नाही. या कंपन्यांना पडलेल्या दराने साखर विकत घेता यावी आणि आंतरराष्ट्रीय बाजारात मार्चमध्ये ८१४ ते ८२७ डॉलर प्रतिटनाने विकून प्रचंड फायदा कमावता यावा, यासाठी हे षड्यंत्र रचण्यात आले आहे. यामागे कोण आहे, याची चौकशी करण्याची मागणी शेट्टी यांनी केली आहे.

वाढत्या महागाईला वायदा बाजारच कारणीभूत असून, त्यामुळे शेतकऱ्यांना फायदा होत नाही. व्यवहार पूर्ण करून मालाची देवाण-घेवाण व्हावी, तरच अर्थ आहे. नाही तर वायदा बाजार बंद करावेत. माल न देता कागदावरच खरेदी-विक्री होते. दलाल व व्यापारी लाखो रुपये कमावतात आणि दर फुगवतात. शेतमालावरील हा सट्टा बंद करावा, अशी मागणी शेट्टी व नारकर यांनी केली. हा बाजार माहिती अधिकाराच्या कक्षेत आणावा, असेही त्यांनी सांगितले.

# महालोक अदालतीवर वकिलांचा कोल्हापूर जिल्ह्यात बहिष्कार

कोल्हापूर, ता. ६ : महालोक अदालतीवर टाकण्यात आलेला बहिष्कार यशस्वी झाल्याचा दावा कोल्हापूर जिल्हा बार असोसिएशनचे अध्यक्ष ॲड. अजित मोहिते यांनी आज दुपारी पत्रकारांशी बोलताना सांगितले. मुंबई उच्च न्यायालयाचे खंडपीठ कोल्हापुरात व्हावे, या मागणीसाठी सुरू असलेल्या प्रयत्नाला वरिष्ठ स्तरावरून कोणताही प्रतिसाद मिळत नसल्यामुळे बहिष्कार घातल्याचे मोहिते यांनी स्पष्ट केले.

अदालतीवर बहिष्कार घातल्यामुळे बार असोसिएशनचे पदाधिकारी सर्व सदस्य गांधी टोपी घालून जिल्हा व सत्र न्यायालयासमोर उभे होते. लोक अदालतीसाठी येणाऱ्या पक्षकारांना गुलाब पुष्प देऊन अदालतीत सहभागी होऊ नये, असे आवाहन करण्यात येते होते. गांधीगिरीने सुरू असलेल्या या अहवानाला पक्षकारही प्रतिसाद देत होते. बार असोसिएशनच्या नोंदवहित अनेकांनी अभिप्राय देऊन आंदोलनाला पाठिंबाही व्यक्त केला. खासदार राजू शेट्टी यांनीही खंडपीठाच्या मागणीसाठी तुमच्या बरोबर असल्याचे दूरध्वनीवरून सांगितल्याचे ॲड. मोहिते यांनी पत्रकारांना सांगितले.




**कामेरी : खासदार राजू शेट्टी यांचा पोलिसपाटील बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते सत्कार झाला. माजी आमदार शिवाजीराव नाईक, सदाशिव खोत उपस्थित होते.**

# समाज व्यवस्था बदलण्याची शेतकऱ्यांमध्ये ताकद : शेट्टी

कामेरी, ता. ७ : संपूर्ण ग्रामीण समाज व्यवस्था बदलण्याची ताकद शेतकऱ्यांमध्ये आहे. राज्यकर्त्यांनी शेतकऱ्यांसाठी विधायक धोरण राबवले पाहिजे, असे मत खासदार राजू शेट्टी यांनी व्यक्त केले.

येथील पोलिसपाटील गटातर्फे आयोजित सत्कार प्रसंगी ते बोलत होते. माजी आमदार शिवाजीराव नाईक अध्यक्षस्थानी होते. श्री. शेट्टी म्हणाले, ''गट, तट बाजूला सारून वैभव नायकवडी यांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी इस्लामपूर येथे झालेल्या मोर्चावेळी ऊस दराबाबत ठोस भूमिका घेतली. शेतकऱ्यांच्या विषयी जाण असणाऱ्या अशा लोकांच्या पाठीशी आपण राहू. शेतकरी सक्षम झाला तर राज्यकर्त्यांची कोंडी होते. राज्यकर्त्यांना लाचाराची फौज हवी असते. पांढऱ्या कपड्यातील दरोडेखोरांना धडा शिकवण्यासाठीच आपण सर्वांनी शेतकऱ्याच्या मुलाला लोकसभेत पाठवले. त्यामुळे येथून पुढील काळात शेतकऱ्यांच्यासाठीचा लढा अखंडितपणे लढू.''

श्री. नाईक म्हणाले, ''वाळवा व शिराळा तालुक्यात देशातील पहिला शिवऊर्जा प्रकल्प राबवू. यासाठी शेतकऱ्यांनी पुढे यावे. शिराळा मतदारसंघात विकासकामांचा डोंगर उभा केला आहे. वाघवाडी परिसरातील जमिनी दोन वर्षांत ओलिताखाली येणार असली तरी तेथे औद्योगिक वसाहतीचा घाट काहींनी घातला आहे. त्यांना आम्ही सांगितले आहे, की वाघवाडीच न धरता कासेगाव ते तांदूळवाडी या महामार्गाच्या बाजूच्या पट्ट्यात औद्योगिक वसाहत निर्माण करा. त्याचा प्रारंभ कासेगावात खोदाई करून करा.'' प्रदेशाध्यक्ष सदाभाऊ खोत यांचे भाषण झाले.

यावेळी कृष्णा कारखान्याचे माजी संचालक सर्जेराव पाटील, अभिनेते विलास रकटे, यशवंत ग्लुकोजचे संचालक शहाजी पाटील, शेतकरी संघटनेचे जिल्हाध्यक्ष बी. जी. पाटील, दि. बा. पाटील, पोपट पाटील उपस्थित होते. पोलिसपाटील बाळासाहेब पाटील यांनी स्वागत केले. अशोक जाधव यांनी प्रास्ताविक केले. महेश पाटील यांनी आभार मानले.

# ऊस वाहतूक व मजुरांसंदर्भात निर्णयांचा पाऊस

सांगली: नियमबाह्य ऊस वाहतूक करणाऱ्या ट्रॅक्टर ट्रॉल्या व ट्रक्सना चाप लावण्यासाठी आज जिल्हाधिकारी श्याम वर्धने यांनी बोलावलेल्या बैठकीत अनेक निर्णयांचा अवकाळी पाऊस पडला. साखर कारखानदारी अडचणीत असल्याचे कारण पुढे करीत बहुतेक संचालक अध्यक्षांनी तूर्त कठोर कारवाई नको, अशी विनंती जिल्हाधिकाऱ्यांना केली.

पाच वर्षांत ऊस वाहतूक करणाऱ्या वाहनांखाली ५२ जण चिरडले. केवळ या वर्षी ३० अपघातांत १७ ठार झाले आहेत. वाढत्या अपघातांची दखल घेत उपप्रादेशिक परिवहन विभागाने कारवाईचा धडाका लावताच गेल्या आठवड्यात जिल्हाधिकाऱ्यांच्या बैठकीकडे पाठ फिरवणारे कारखानाचालक आजच्या बैठकीला मात्र अर्धा तास आधी हजर होते. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी विलास कांबळे यांनी बहुतेक ट्रॉल्यांमध्ये सतरा ते अठरा टन ऊस वाहतूक सुरू असते, असे विधान केल्यानंतर कारखाना प्रतिनिधींनी अडचणींचा पाढा वाचण्यास सुरवात केली. जिल्हाधिकाऱ्यांनी मध्यस्थी करीत किमान काही बंधणे पाळणे आवश्यक असल्याचे ठासून सांगत कारखाना वाहनतळाच्या प्रवेशद्वारावर १३.८ उंचीचा ग्रेड सेप्रेटर (लोखंडी आडवा पोल) उभे करण्याचा निर्णय झाला. येत्या आठ दिवसांत असे सेप्रेटर उभारणे बंधणकारक करण्यात आले. टेप लावून तसेच एकच डिमर लाईट लावून चालवणाऱ्या वाहनचालकांवर कठोर दंडात्मक कारवाई करणे, मागील ट्रॉलीला तात्पुरते डेंजर लाईट उसाच्या मोळ्यांना लावण्याबाबत यावेळी सर्वसंमती झाली.

जिल्ह्यात ऊसतोड मजुरांची २ हजार ४२८ मुले शाळा सोडून कामावर आली असल्याचे सर्वेक्षणात स्पष्ट झाले आहे. प्राथमिक शिक्षणाधिकारी नागनाथ पाटील यांनी या मुलांना जवळच्या शाळेत पाठवण्याचे आवाहन केले. जिल्हाधिकाऱ्यांना या मुलांसाठी पहिल्या टप्प्यात कारखान्याच्या वाहन तळावर तात्पुरत्या शाळा उभारणे व तेथे जिल्हापरिषदेतर्फे अंगणवाडी शिक्षिका व प्राथमिक शिक्षक हजर ठेवण्यात येणार आहे. याशिवाय प्रत्येक वाहनतळावर आरोग्य तपासणीचाही निर्णय यावेळी झाला.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी अश्विनीकुमार, अधिष्ठाता शेखर राजदेरकर, वसंतदादा कारखान्यांचे विशाल पाटील, सोनहिरा कारखान्याचे मोहनराव कदम, हुतात्मा कारखान्याचे ए. पी. देशमुख, मोहनराव शिंदे कारखान्याचे एस. एस. गोसावी, राजारामबापू कारखान्याचे पी. आर. पाटील, तासगाव कारखान्याचे कृष्णराव गोंजारी, विश्वास कारखान्याचे बी. डी. पवार, माणगंगा कारखान्याचे राजेंद्र देशमुख उपस्थित होते.

### बैठकीतील निर्णय

- ऊस वाहतुकीच्या सर्व वाहनांना आवश्यक तेथे रिफ्लेक्टर बसवणार
- वाहनतळावर ऊसतोड मजुरांच्या मुलासाठी शाळा-पाळणाघरे
- भरलेल्या ऊस ट्रॉलीची उंची १३.८ फुटांपेक्षा जास्त असू नये यासाठी सेप्रेटर करणार
- रस्त्यावर बंद पडलेल्या ट्रॉल्या हटवण्यासाठी कारखान्यांमध्ये नियंत्रण कक्ष सुरू करणार
- ऊसतोड मजुरांसाठी तात्पुरत्या शौचालयाची व्यवस्था करणार
- ऊस वाहतुकीच्या चालकांसाठी प्रशिक्षण शिबिरे आयोजित करणार
- ऊसतोड मजुरांसाठी दरमहा वाहनतळावर आरोग्य तपासणी शिबिरे



सांगली : विज वितरणच्या अधिकाऱ्यांना स्वाभिमानीच्या संदीप राजोबा यांनी धारेवर धरले.

# स्वाभिमानी शेतकरी संघटनेची वीज महावितरणसमोर निदर्शने

## अधिकाऱ्याकडून माफी : राजू शेट्टींना सभेचे निमंत्रण नसल्याचा निषेध

सांगली : जिल्हा विद्युत समन्वय समितीची आज केंद्रीय कोळसा राज्यमंत्री प्रतीक पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली. त्याला खासदार राजू शेट्टी यांना सदस्य म्हणून निमंत्रण दिले नव्हते. त्याचा निषेध म्हणून स्वाभिमानी शेतकरी संघटनेच्या कार्यकर्त्यांनी महावितरणच्या कार्यालयासमोर निदर्शने केली. अधिकाऱ्याचा निषेध केला. विद्युत निरीक्षकांनी माफी मागितल्यानंतर या प्रकरणावर पडदा पडला.

मिरज येथील सार्वजनिक बांधकाम विभागाशी संलग्न असलेल्या विद्युत निरीक्षक कार्यालयामार्फत तीन महिन्यांतून एकदा जिल्हा समन्वय समितीची सभा घेण्यात येते. सभेचे सचिव विद्युत निरीक्षक एम. आर. बोध आहेत. जिल्ह्यातील सर्व आमदार, खासदार, वीज वितरणचे अधीक्षक अभियंता, कार्यकारी अभियंता सदस्य आहेत. आज प्रतीक पाटील यांच्या अध्यक्षतेखाली सभा झाली; परंतु त्याला राजू शेट्टी यांना निमंत्रित केले नव्हते. याची माहिती स्वाभिमानी संघटनेच्या कार्यकर्त्यांना लागली. त्यानंतर संघटनेचे युवा आघाडीचे जिल्हाध्यक्ष संदीप राजोबा, बी. जी. पाटील, संभाजी मेंढे, महावीर पाटील यांनी थेट महावितरण कार्यालयावर धडक मारली. विद्युत निरीक्षकांचा निषेध करत अधीक्षक अभियंता आर. डी. चव्हाण यांच्या कार्यालयात ठिय्या मारला. या ठिकाणी श्री. बोध यांनी येऊन फोनवरून खासदार शेट्टी यांची माफी मागितली. त्यानंतर या प्रकरणावर पडदा पडला.



# आवळा बहुगणी लागवड करा

## पिक-पाणी

डॉ. जिनेंद्र धनपाल चौगुले
प्लॉट नं. २९, चंद्रधन, माहेर हॉस्पिटलजवळ नांदणी रोड, जयसिंगपूर. येथे संपर्क साधावा. फोन २२४५१९. मो. ९९२२७७२८१५

आवळा हे एक बहुगुणी कोरडवाहू फळपीक असून महाराष्ट्रात अतिशय चांगले उत्पादन देत आहे. आवळा फळात क जीवनसत्व असते. हे प्रमाण लिंबू वर्गीय फळापेक्षा ५ ते ७ पट जास्त आहे. या व्यतिरिक्त लोह, ब जीवन सत्व, चुना, सार, खनिज द्रव्ये आणि तंतूमय पदार्थ सुध्दा भरपूर प्रमाणात असतात, म्हणून आयुर्वेदात आवळ्यापेक्षा शक्तीदायी व सर्व गुणसंपन्न दुसरे फळ नाही. चवनप्राश त्रिफळाचुर्ण आणि कित्येक आयुर्वेदिक औषधामध्ये आवळा हाच मुख्य घटक असतो. आवळ्याचा मोरावळा, कँडी, लोणचे, चटणी, आवळासुपारी इ. पदार्थ तयार केले जातात. वर्षभरात एका माणसाने किमान १० कि. आवळे खावेत. त्यामुळे तुम्हाला आरोग्य तारूण्य आणि दिर्घायुष्य मिळवता येईल. जवळ जवळ १५० रोगावर आवळ्याचे विविध उपयोग करता येतो.

महाराष्ट्रात आवळा हे कोरडवाहू पीक म्हणून घेणे शक्य आहे. त्यामुळे शेतकऱ्यांना यापिकाविषयी बऱ्याचशा गोष्टी माहित करून घेणे आवश्यक आहे. म्हणून आवळयाची नवीन लागवड खाली दिले आहेत.



**१) जमिन व हवामान:** आवळा हे समशितोष्ण कटिबंधात चांगले वाढते. महाराष्ट्रात आवळा चांगला येऊ

पान १५ वर ▸

# आवळा बहुगणी लागवड करा

▸ पान १४ वरुन

शकतो. आवळा काळ्या, मुरमाड, चांगला निचरा होणारे जमिन उत्तम, क्षारयुक्त जमिनीत सुध्दा आवळ्याची शेती करता येथील पण उत्पादनात घट येते.

**२) लागवड व जात** : आवळ्याची लागवड बियापासून केले असता ८ ते ९ वर्षांनी फळे येतात. पावसाळा संपत आला असताना म्हणजे शक्यतो ऑगस्ट - सप्टेंबर महिन्यात २२ बाय २२ फूट फूटचे खड्डे घेऊन, ६ बाय ६ अथवा ७ बाय ७ मीटर अंतरावर कलम केलेले रोप लावावेत. रोप लावताना रोपाभोवती पाणी साचून राहणार नाही याची काळजी घ्यावी. रोपे संध्या काळच्या वेळी लावावीत. अधिक उत्पादन मिळविण्याच्या दृष्टीने सुधारित जातीची लागवड म्हणजे बनारसी, कांचन कृष्णा, एन. ए. ७, एन. ए. १० जातीपैकी एकजात निवडावेत.



**३) पाणी व खत** : हे कमी पाण्यात येणारे झाड आहे. पहिले २ - ३ वर्ष पाण्याची काळजी घेतल्यास कोरडवाहू जमिनीत ही हे पीक पावसाचे पाण्यावर तग धरू शकेल. फेब्रुवारीपासून पाणी तोडावे लागते. डिसेंबर - जानेवारी महिन्यात नवीन पालवी आणि फुले येतात. ते ८ ते १५ दिवसामध्ये फळ धारणा होते. व नंतर जवळपास १०० दिवस फळे सुप्त अवस्थेत राहतात. पावसाच्या प्रथम आगमनाबरोबर फळे वाढीला सुरवात होते. फळाची तोडणी ऑक्टोंबर - नोव्हेंबर महिन्यात होत असते. पावसाळा सुरू होण्यापूर्वी प्रत्येक झाडाला ५ ते १० किलो चांगला कुजलेली शेणखत त्याचबरोबर १०० ग्रॅम नत्र, १०० ग्रॅम स्फूरद व ५० ग्रॅम पालाश द्यावा.

**४) उत्पादनः** एका एकरात साधारण ९० झाडे बसतात. पूर्ण वाढ झालेल्या झाडापासून सरासरी १०० ते १२५ किलो फळे मिळतात. म्हणजे साधारणतः ९००० ते ११००० किलो एकरी आवळ्याची उत्पादन मिळतो. तरी खर्च व जाताना एकरी रूपये ६०००० ते ७०००० पर्यंत नफा मिळवणे शक्य आहे. तरी शेतकऱ्यांना यांचा फायदा करून घ्यावा.